| | | |
|---|---|---|
| **MHLA090017982019** | दाखल दिनांक | ०१/०७/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | ०१/०७/२०१९ |
| | निकाल दिनांक | ०१/०६/२०२६ |
| | कालावधी | ०६ व. ११ म. ०० दि. |

## भाग–अ

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**i**))

# उदगीर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

[के. ए. यादव, २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर यांचेसमोर]

[जाहीर दिनांक – ०१/०६/२०२६]

**निशाणी क्र.४६**

| | |
|---|---|
| **खटला क्रमांक –** | **नियमित फौजदारी खटला क्र.१४५/२०१९** |
| **गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे –** | गुन्हा रजि. क्र.३५/२०१९,<br>वाढवणा पोलीस ठाणे, उदगीर. |
| **अभियोग पक्ष –** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार,<br>वाढवणा पोलीस ठाणे, उदगीर,<br>ता. उदगीर, जि. लातूर. |
| **प्रतिनिधित्व –** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. टी. उगलमुगले |
| आरोपी | १. **संतोष दत्तात्रय गुट्टे**<br>वय–३६ वर्षे, धंदा– नोकरी,<br>२. **दत्तात्रय धोंडीराम गुट्टे**<br>वय–६० वर्षे, धंदा– शेती, |

| | |
|---|---|
| | **३. रेवताबाई दत्तात्रय गुट्टे**<br>वय–५२ वर्षे, धंदा– शेती,<br><br>**४. व्यंकटराव दत्तात्रय गुट्टे**<br>वय–३३ वर्षे, धंदा– शेती,<br>१ ते ४ रा. देऊळवाडी, ता. उदगीर, जि. लातूर.<br><br>**५. गिरजाराम बाबुराव केंद्रे**<br>वय–५० वर्षे, धंदा– शेती,<br>रा. एकूर्का खु., ता. उदगीर, जि. लातूर.<br><br>**६. लक्ष्मण माधवराव केंद्रे**<br>वय–६५ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. मुत्तलगाव, ता. उदगीर, जि. लातूर. |
| **प्रतिनिधित्व –** | श्री. बी. एन. बोळे, विधिज्ञ |

## भाग– ब

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii) )**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०५/११/२०१४ ते १६/०६/२०१८ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याचा दिनांक | ०९/०२/२०१९ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | ०१/०७/२०१९ |
| आरोपीविरूद्ध दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ३१/१०/२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ झाल्याचा दिनांक | ०४/०५/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाचा आरक्षित दिनांक | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/०६/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | –/– |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करिता संपरिक्षेदरम्यान निरूद्ध केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संतोष दत्तात्रय गुट्टे | –– | फौ.प्र.सं. कलम ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | भा.द.वी. कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |
| २ | दत्तात्रय धोंडीराम गुट्टे | –– | फौ.प्र.सं. कलम ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | भा.द.वी. कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |
| ३ | रेवताबाई दत्तात्रय गुट्टे | –– | फौ.प्र.सं. कलम ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | भा.द.वी. कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |
| ४ | व्यंकटराव | –– | फौ.प्र.सं. कलम | भा.द.वी. कलम | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दत्तात्रय गुट्टे | | ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |
| ५ | गिरजाराम बाबुराव केंद्रे | –– | फौ.प्र.सं. कलम ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | भा.द.वी. कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |
| ६ | लक्ष्मण माधवराव केंद्रे | –– | फौ.प्र.सं. कलम ४१–अ अन्वये नोटीस दिल्याने अटक नाही. | भा.द.वी. कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुं.बं.अ. कलम ३ व ४ | निर्दोष | –/– | –/– |

## भाग – क

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(**iii**) )

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा. १ | राजश्री संतोष गुट्टे | फिर्यादी | ४३ |

### ब. आरोपी तर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

ब. आरोपीचा पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | – | सी.डी., लग्नातील फोटो व लग्नपत्रिका. |

# न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक ०१/०६/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपी विरूद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ चे कलम ३, ४ या अपराधासाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. फिर्यादीचा विवाह आरोपी क्र.१ यांच्यासोबत दि.०४/०७/२०१४ रोजी झाला. त्यानंतर फिर्यादी नांदण्यासाठी त्यांच्या सासरी गेली. त्यावेळी सर्व आरोपींनी फिर्यादीस काही दिवस चांगले नांदवून घरगुती कारणावरून व लग्नातील मानपानावरून दिनांक ०५/११/२१४ ते दिनांक १६/०६/२०१८ या कालावधीत मानसिक, भावनिक व शारीरिक छळ करण्यास सुरूवात करून मध्यंतरी दोन दिवस घरात कोंडून ठेवले. फिर्यादीस फसवून घटस्फोटाच्या कागदापत्रावर सही घेतली. तसेच उर्वरित हुंड्याच्या पैशांची मागणी करून सतत शिवीगाळ व मारहाण करीत आणि जीवे मारण्याची धमकी देवून माहेरी जाण्यास भाग पाडले. त्यामुळे आरोपींविरूद्ध फिर्याद दाखल करण्यात आली.

३. त्यावरून वाढवणा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. ३५/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला व त्याचा तपास पोलीस अधिकारी श्री. जी. के. शेख यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी संबंधित साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीपर **निशाणी क्र.२२** येथे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह

कलम ३४ व हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ चे कलम ३, ४ अन्वये दोषारोप ठेवला. तो आरोपीला मराठीत वाचून व समजावून सांगितला. त्यांनी त्यांच्यावरील आरोपी नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीवरील अपराध शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे 'भाग– क' मध्ये नमूद केल्याप्रमाणे कागदोपत्री पुरावे व साक्षीदार तपासले आहेत. आरोपीविरूद्ध कथने आली नसल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) चे निवेदन वगळण्यात आले.

५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. के. टी. उगलमुगले व आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी. एन. बोळे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यानंतर अभिलेखाचे अवलोकन केले. साक्षीदारांचे जाबजबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पाहता सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दिनांक ०५/११/२०१४ पासून ते १६/०६/२०१८ रोजीपर्यंत सर्व आरोपींनी संगनमत करून फिर्यादीस हुंड्याच्या कारणावरून शिवीगाळ व मारहाण करून शारीरिक, भावनिक व मानसिक त्रास देवुन जाच जुलूम केला आणि छळ करून घराबाहेर हाकलून दिले व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | घरामध्ये दोन दिवस डांबून ठेवले व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ३४२ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमूद कालावधीत व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांची दुसऱ्या लग्नाच्या परवानगीचे शपथपत्र भासवून घटस्फोटाच्या कागदपत्रांवर सही घेतली व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ४१८ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्या मागचा उद्देश होता व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ६. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ७. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, वर नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना वेळोवेळी हुंड्याची मागणी केली व त्याद्वारे **हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ चे कलम ३ व ४** अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ८. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

६. अभियोग पक्षातर्फे आरोपीवरील दोष सिद्धतेसाठी 'भाग–क' मध्ये दर्शविलेले साक्षीदार व कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. याउलट आरोपीतर्फे कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ७ करिता–**

७. सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे विवेचन एकत्र केले आहे.

८. अभियोग पक्षाने आरोपीवरील अपराध शाबित करण्यासाठी साक्षीदार क्र.१ **राजश्री संतोष गुट्टे (फिर्यादी)** यांची साक्ष **निशाणी क्र.४३** येथे नोंदविली आहे. त्यांनी त्यामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१४ मध्ये आरोपी क्र.१ सोबत त्यांचा विवाह झाला. विवाहानंतर त्या राहण्यासाठी देऊळवाडी, ता. उदगीर, जि. लातूर येथे गेल्या. विवाहानंतर त्या आरोपीसोबत राहत होत्या. आरोपीसोबत राहत असताना त्यांच्यासोबत किरकोळ वाद झाला. त्यामुळे त्यांनी आरोपीविरूद्ध वाढवणा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यांना फिर्याद **(नि.क्र.४४)** दाखविण्यात आली असून त्यावरील सही त्यांची आहे, परंतु त्यातील मजकूर त्यांना सांगता येत नाही. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांच्या विनंतीवरून सदर साक्षीदारास सूचक प्रश्न विचारण्याची अनुमती अभियोग पक्षास देण्यात आली. त्याप्रमाणे तपशीलवारपणे विचारणा करण्यात आली. परंतु अभियोग पक्षास उपयुक्त अशी साक्ष त्याच्या तोंडून वदवून घेण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे वकिलांनी उलटतपास घेतलेला नाही.

९. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा शाबीत करण्यासाठी फक्त

फिर्यादीची साक्ष नोंदविली आहे. तपासिक अंमलदार, पंच साक्षीदार व अन्य साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीवरील अपराध शाबित होईल असा सबळ पुरावा अभिलेखावर आला नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. वरील बाबींचे अवलोकन केले असता आरोपीने कथित गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे शाबीत केले नाही. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ चे कलम ३, ४ प्रमाणे गुन्हा केल्याचे संशयापलीकडे शाबीत होत नाही. सबब, मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.८ करिता–**

**१०.** मुद्दा क्र. १ ते ७ चे निष्कर्ष पाहता आरोपीची प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मुद्दा क्र.८ करिता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.**१. संतोष दत्तात्रय गुट्टे, २. दत्तात्रय धोंडीराम गुट्टे, ३. रेवताबाई दत्तात्रय गुट्टे, ४. व्यंकटराव दत्तात्रय गुट्टे, ५. गिरजाराम बाबुराव केंद्रे, ६. लक्ष्मण माधवराव केंद्रे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ३४२, ४१८, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१ चे कलम ३, ४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जामीन कतबा व जात मुचलका रद्द करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये प्रत्येकी रु.२५,०००/- चा लायक जामीनदाराचा जामीन कतबा व जातमुचलका देणेचा आहे. |
| ४. | मुद्देमाल नामे एक सी.डी., लग्नातील फोटो व लग्नपत्रिका ही मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.06.01 17:21:06 +0530

उदगीर
दि.०१/०६/२०२६

**(के. ए. यादव)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर
(न्यायालय क्र.२)

# प्रमाणपत्र

| | | |
|---|---|---|
| मी कबूल करतो की, या पीडीएफ फाईलमधील निकाल/ऑर्डरमधील मजकूर मूळ निकाल/ऑर्डर प्रमाणेच आहेत. | | |
| न्यायालयाचे नाव | :- | २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | श्री. द. भ. बनसोडे, श्रेणी-३ |
| निकालाची तारीख | :- | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय / आदेशावर न्यायिक अधिकाऱ्यांनी सही केल्याची तारीख | :- | ०१/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय / आदेश अपलोड केल्याची तारीख | :- | ०१/०६/२०२६ |